**आर बी आय/ २००६-०७/ २१७**
संदर्भ क्र. डी जी बी ए. सी डी डी . क्र. एच/ **१००२४**/ १५.१५.००१/ २००६-०७

डिसेंबर २२, २००६

प्रति,

व्यवस्थापक
शासकीय लेखा विभाग, प्रधान कार्यालय
स्टेट बँक ऑफ इंडिया/स्टेट बँक ऑफ इंदोर/स्टेट बँक ऑफ पतियाळा /स्टेट बँक ऑफ बिकानेर अँड जयपूर/स्टेट बँक ऑफ सौराष्ट्र /स्टेट बँक ऑफ त्रावणकोर/स्टेट बँक ऑफ हैद्राबाद/स्टेट बँक ऑफ म्हैसूर/अलाहाबाद बँक /बँक ऑफ बरोडा/बँक ऑफ इंडिया/बँक ऑफ महाराष्ट्र/ कॅनरा बँक/ सेंट्रल बँक ऑफ इंडिया/कार्पोरेशन बँक/देना बँक इंडियन बँक/इंडियन ओव्हर्सिज बँक/पंजाब नॅशनल बँक /सिंडिकेट बँक/युको बँक / युनियन बँक ऑफ इंडिया / युनायटेड बँक ऑफ इंडिया / विजया बँक/ आय सी आय सी आय बँक लि.

प्रिय महोदय,

**<u>एन आर आय व पी आय ओ यांना नामनिर्देशित केले जाण्याबद्दल - स्पष्टिकरण</u>**
**<u>वरिष्ठ नागरिक बचत योजना, २००४ मध्ये</u>**

कृपया आमचे परिपत्रक आर बी आय/ २००५-०६/ ४३१ संदर्भ क्र.. डी जी बी ए. सीडीडी. क्र. एच- २०६९२/ १५.१५.०१/ २००५-०६ दिनांक जून २६, २००६ चा संदर्भ घ्यावा. त्यात आमच्याकडून इतर बाबींबरोबर, वरिष्ठ नागरिक बचत योजना, २००४ मध्ये, पी आय ओ कार्ड धारकांच्या, गुंतवणुक करण्याबाबत/ या योजनेत त्यांना नामनिर्देशित करण्याच्या अर्हतेबाबतच्या प्रश्नांसंबंधी काही स्पष्टीकरणे देण्यात आली होती.

२. आम्हाला, अंदाजपत्रक विभाग, अर्थशास्त्रीय व्यवसाय विभाग, भारत सरकार यांच्याकडून मिळालेल्या पत्र क्र. एफ.१५/८/२००५/ एन एस इइ दिनांक डिसेंबर १४, २००६ नुसार उभय नागरिकत्व (भारतीय व अन्य ) असलेले अनिवासी भारतीय या योजनेत नामनिर्देशित असू शकतात. परंतु ठेवीदाराचा मृत्यू झाल्यास मात्र ते, ते खाते पुढे ठेवू शकणार नाहीत. तसेच त्या खात्यातील रकमेचे त्यांना प्रत्यावर्तन करता येणार नाही असे स्पष्टीकरण देण्यात आले होते.
३. या परिपत्रकातील मजकुर आपल्या बँकेच्या नियोजित शाखांच्या, माहितीसाठी व मान्यतेसाठी पाठवावा.
४. कृपया पोच द्यावी.

आपला विश्वासू

( बालू. के )
उपमहाव्यस्थापक